वैयक्तिक संबंध निर्माण होवू शकतात. व माहितीचे आदान प्रदान ही प्रक्रिया अधिक प्रभावी होवू शकते.

**ग्रंथपाल-वाचक संप्रेषणातील अडथळे :** ग्रंथालयात ग्रंथपाल व वाचक यांच्यातील संप्रेषण हे बहुतांश मौखिक स्वरुपातील असते. त्यामुळे या प्रक्रियेत संभाव्य अडथळे खालीलप्रमाणे असू शकतात.

१) वाचकाकडून माहिती, गरज नीट न नोंदवणे :- वाचकाला हवी असलेली माहिती नेमक्या शब्दात जर वाचकाने नोंदवली नाही तर ग्रंथपाल योग्य माहितीपर्यंत वाचकाला नेवू शकत नाही.

२) ग्रंथपालाकडून सांगितलेली माहितीचे आकलन न होणे :- काही वेळेस वाचकाची नेमकी माहितीची गरज ग्रंथपाल आकलन करु शकत नाही व ती माहिती पुरवू शकत नाही.

३) पूर्वग्रह दृषीत असणे :- काही वेळेस वाचकांबद्दल ग्रंथपालाच्या मनात जर पूर्वग्रह दुषीत असेल तर माहिती प्रचार प्रसारात मोठा अडथळा निर्माण होवू शकतो.

४) वातावरण :- ग्रंथालय परिसरात आवाज गोंधळ असल्यास वातावरण संप्रेषण व्यवस्थित होवू शकत नाही.

५) मानसिक अडथळा :- हा अडथळा वाचक व ग्रंथपाल दोहोंच्या बाबतीत असू शकतो. कोणीही व्यक्ती संवाद साधतांना त्या व्यक्तीच्या वैयक्तिक भावना, मते, त्या व्यक्तीची एकंदरीत झालेली वाढ होतांनाची परिस्थिती याचा प्रभाव पडत असतो.

६) नियमांचा अनाठायी आग्रह :- कोणतीही व्यवस्था सुरळीत सुरु रहावी म्हणून नियम घातले असतात. परंतू त्याचा अत्याग्रह सुद्धा संप्रेषणास अडथळा निर्माण करु शकतो.

७) लिंगभेद अडचणी :- वाचक व ग्रंथपाल जर भिन्न लिंगी असले तर त्यांच्या नैसर्गिक विषमतेमुळे संवादात अडथळे निर्माण होवू शकतात.

८) शारिरीक अडथळे :- वाचक व ग्रंथपाल यांच्यात शारिरीक मर्यादा, आजारपण इ. मुळे संप्रेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण होवू शकतो.

९) सौजन्यशील वर्तनाचा अभाव :- ग्रंथालयात ग्रंथपाल सौजन्यशील, अगत्यशील व वाचकांप्रती सहानुभूती बाळगणारा नसेल तर संप्रेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण होवू शकतो.

१०) ग्रंथपालामध्ये आत्मविश्वासाचा अभाव :- अनेकवेळा ग्रंथपाल हा स्वतःचे अस्तित्व दाखवून देण्यास असमर्थ ठरतो. तर काही ठिकाणी वयोमानानुसार आत्मविश्वास कमी होतांना दिसतो.

**ग्रंथपालाचे संप्रेषण प्रभावी करणारे घटक :**

१) भाषा :- ग्रंथपालाची भाषा, शब्द निवड, सौजन्यता, सभ्यता, मृदुपणा इ. वैशिष्ठेयुक्त असावी. त्यामुळे वाचक सहज जुळला जाईल व त्याची मागणी योग्य प्रकारे नोंदवू शकतो.

२) व्यक्तीमत्त्व :- ग्रंथपालाचे व्यक्तीमत्त्व प्रसन्न, अगत्यशील, सकारात्मक असावे. त्यामुळे वाचकांच्या मनातील संकोच दूर होवू शकतो.

३) श्रवण :- आलेल्या वाचकाची मागणी शांतपणे मध्ये न टोकता एकून घ्यावी. त्याचे बोलणे पूर्ण झाल्यावर सोपे प्रश्न विचारुन अधीकची माहिती जाणून घेतली पाहीजे.

४) भावनांवर नियंत्रण :- वाचकाशी संवाद करतांना शांत चित्त असावे. वैयक्तिक अडीअडचणीमुळे वा असुखद परिस्थितीमुळे राग, चिडचिड, आक्रस्ताळेपणा

वागणुकीत येता कामा नये.

५) देहबोली :- वाचकाशी संवाद साधतांना ग्रंथपालाने योग्य देहबोली ठेवली तर संप्रेषण अधिक प्रभावी होवू शकते.

६) वाचन कौशल्य :- ग्रंथपाल हा स्वतः उत्तम वाचक असावा. ग्रंथालयात दाखल होणारे वाचन साहित्य सर्वप्रथम ग्रंथपालाच्या टेबलावर येते. त्याने किमान ते चाळून त्याचा विषय स्मरणात ठेवला पाहीजे व योग्यवेळी योग्य वाचकाला तो उपलब्ध करुन दिला पाहीजे.

७) तंत्रज्ञानाचा अवलंब :- बदलत्या काळात वाचकांच्या गरजा सुद्धा बदलत आहेत. त्यांनी अपेक्षित माहिती विविध प्रकारची व विविध स्वरुपात असते. अशावेळी पारंपारिक ग्रंथालय शास्त्राबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान ग्रंथपालाने आत्मसात केल्यास संप्रेषण प्रक्रिया प्रभावी होवू शकतो.

८) आत्मप्रौढी व पदाचा अभिमान :- ग्रंथपाल हा माहिती शोधून देण्याच्या कार्यासाठी प्रशिक्षित असतो. त्यामुळे वाचकांना माहिती देताना आत्मप्रौढी किंवा आपल्या पदाचा मोठेपणा व्यक्त होणे टाळावे म्हणजे वाचक व ग्रंथपालामध्ये सहजता निर्माण होवू शकते.

**समारोप :**

निर्माण झालेले ज्ञानसाहित्य सांभाळणारे, त्याचा प्रचार प्रसार करणारे ग्रंथपाल आधुनिक तंत्रज्ञान व खास करुन विविध जीवनकौशल्ये आत्मसात करणारे असावे. जर ग्रंथपाल बोलका असेल तर तो उपलब्ध वाचन साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग वाचकांना करुन देवू शकतो. म्हणून प्रत्येक ग्रंथपालाने संप्रेषण हे जीवन कौशल्य जाणीवपूर्वक विकसित केले पाहीजे.

**संदर्भ :**

१) डॉ. तुरीले-सुखदाणे छाया, डॉ.कोठारी पी.एम. डॉ.नंदनवार के.पी.- व्यावसायिक संज्ञापन, प्रशांत पब्लिकेशन-२०१६

२) डॉ. गिरासे एस.पी., डॉ. मोरे जे.बी., श्री. जैन व्ही.एस. -व्यवहार कौशल्य, प्रशांत पब्लिकेशन-२०१९

३) डॉ. तुरीले-सुखदाणे छाया, डॉ.श्रीनिवास जोशी - व्यावसायिक

*Cite This Article:*

Dautkhane S.S.& Dr. Patil T.M. (2023). **ग्रंथपालांमधील संप्रेषण जीवन कौशल्य : एक नवीन विचार प्रवाह**. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 70–72). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10475008